# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 13 January 2026

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १३ जानेवारी २०२६ सकाळी ७.१० मि.**

****

- आगामी आर्थिक वर्षाचा केंद्रीय अर्थसंकल्प येत्या एक फेब्रुवारीला सादर होणार
- राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांची निवडणूक प्रक्रिया १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्यास सर्वोच्च न्यायालयाची परवानगी
- महापालिका निवडणूक प्रचाराचा आज शेवटचा दिवस, मतदारचिठ्ठी वाटपासाठी तंत्रज्ञानाचा वापर
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात पहिल्या लोककला महोत्सवाचा समारोप, यजमान संघानं पटकावलं सर्वसाधारण विजेतेपद

आणि

- राज्यात बहुतांश भागात किमान तापमानात घट

****

आगामी आर्थिक वर्षाचा केंद्रीय अर्थसंकल्प येत्या एक फेब्रुवारीला रविवारी संसदेत सादर होणार आहे. लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी काल दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. एक फेब्रुवारीला सकाळी अकरा वाजता अर्थसंकल्प सादर होणार असल्याचं, बिर्ला यांनी सांगितलं. २८ जानेवारीपासून संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होणार असून, दोन टप्प्यात चालणाऱ्या या अधिवेशनाचं पहिलं सत्र २८ जानेवारी ते १३ फेब्रुवारीपर्यंत तर दुसरं सत्र नऊ मार्च ते दोन एप्रिलपर्यंत चालणार आहे.

****

राष्ट्रीय क्रीडा प्रशासन कायदा, २०२५ अंतर्गत केंद्र सरकारने काल राष्ट्रीय क्रीडा प्रशासन नियम, २०२६ अधिसूचित केले. प्रतिभावान खेळाडूंचा समावेश, कार्यकारी समितीची रचना तसंच राष्ट्रीय क्रीडा संस्था आणि प्रादेशिक क्रीडा महासंघांच्या सदस्यांच्या अपात्रतेचे निकष, हे नियम निश्चित करतात. राष्ट्रीय क्रीडा मंडळासह राष्ट्रीय क्रीडा निवड समितीसंदर्भातल्या प्रक्रिया देखील यात विशद केलेल्या आहेत. त्यानुसार राष्ट्रीय क्रीडा संस्थांच्या सर्वसाधारण सभेत किमान चार उत्कृष्ट खेळाडू आणि किमान ५० टक्के महिला खेळाडूंचा समावेश आवश्यक करण्यात आला आहे.

****

राज्यातल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांची निवडणूक प्रक्रिया १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्याची परवानगी सर्वोच्च न्यायालयानं दिली आहे. मतदान यंत्रांची कमतरता, प्रशासकीय अडचणी यासारखी कारणं देत राज्य निवडणूक आयोगानं ३१ जानेवारीची मुदत १० फेब्रुवारीपर्यंत वाढवून द्यावी, अशी विनंती केली होती. आरक्षण मर्यादा न ओलांडलेल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांची निवडणूक १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयानं काल दिले. उर्वरित २० जिल्हापरिषदांच्या निवडणुकांच्या संदर्भात २१ फेब्रुवारीला सुनावणी होणार आहे.

****

राज्यात महानगरपालिका निवडणूकीचा प्रचाराचा आज शेवटचा दिवस आहे. आज संध्याकाळी साडे पाच वाजता प्रचार संपणार आहे. त्यानंतर १५ जानेवारीला मतदान होईल. मतदान प्रक्रिया शांततेत, पारदर्शकपणे आणि निष्पक्ष होण्यासाठी उद्या आणि परवा पालिकेची भरारी पथके तसंच पोलीस प्रशासनातर्फे कडक बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

****

मनपा निवडणुकीत सर्व मतदारांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता, आपल्या मताधिकाराचा निर्भयपणे वापर करावा, असं आवाहन ज्येष्ठ अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांनी आकाशवाणीच्या माध्यमातून केलं आहे. त्या म्हणाल्या...

**बाईट – मृणाल कुलकर्णी**

****

मतदान प्रकियेसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज होत आहे. छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या निवडणूक विभागाने कर्तव्यावर असलेल्या मतदारांसाठी काल टपाली मतपत्रिका वितरित केल्या. सर्व प्रभागांमध्ये मिळून दोन हजार २२८ टपाली मतपत्रिका वितरित केल्याचं, महापालिकेकडून सांगण्यात आलं.

**

मतदारांना पोलचिट अर्थात मतदारचिठ्ठी वाटपासाठी तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. छत्रपती संभाजीनगर महापालिका प्रशासनाने यासाठी वॉट्सअॅपचा मोबाईल क्रमांक जारी केला आहे. ९७ ६४ ८३ ११ ११ या क्रमांकावर मतदाराने हाय असा मेसेज करून आपला मतदार ओळखपत्र क्रमांक टाकल्यास, मतदान केंद्रासह सर्व माहिती वॉटस्अॅपवर उपलब्ध होणार आहे. या सुविधेसाठी एक विशेष क्यूआर कोडही महापालिकेने जारी केला आहे.

**

लातूर महानगरपालिका प्रशासनाने मतदारांना विशेष ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. या ऑनलाईन सुविधेमार्फत मतदारांना मतदान केंद्राची माहिती मिळेल, तसंच आपला मोबाईल क्रमांक दिल्यास मतदार चिठ्ठी उपलब्ध होणार आहे. यासाठी मतदारांनी https कोलन laturcity डॉट in या लिंकचा वापर करावा, असं आवाहन करण्यात आलं आहे.

****

महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यात आदर्श आचारसंहिता लागू असताना 'लाडकी बहीण' योजनेचा नियमित किंवा प्रलंबित लाभ देता येईल; परंतु जानेवारी महिन्याचा लाभ अग्रिम स्वरुपात देण्यास राज्य निवडणूक आयोगाने मज्जाव केला आहे. यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या काही बातम्यांच्या आधारे राज्य निवडणूक आयोगाकडे विविध तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने आयोगाने हा खुलासा केला.

****

राजमाता जिजाऊसाहेब यांची ४२८ वी जयंती आणि स्वामी विवेकानंद यांची १६३वी जयंती काल साजरी झाली. बुलडाणा जिल्ह्यात सिंदखेडराजा इथं राजे लखुजी जाधव यांच्या राजवाड्यात असलेल्या जिजाऊंच्या जन्मस्थळी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते शासकीय महापूजा पार पडली. यावेळी राजे लखुजी जाधव यांचे वंशज शिवाजी जाधव यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हाधिकारी कार्यालयात उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, उपजिल्हाधिकारी रुपेश शिनगारे यांच्या हस्ते जिजाऊ तसंच विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार करुन अभिवादन करण्यात आलं.

शहरात यानिमित्ताने वाचन उपक्रम, स्वच्छता अभियान तसंच वृक्षारोपण अभियान राबवण्यात आलं, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचं वाटप करण्यात आलं. विविध शाळेतल्या विद्यार्थ्यांनी जनजागृती फेरी काढली, तसंच युवकांची दुचाकी, चारचाकी वाहन फेरी देखील काढण्यात आली.

नांदेड इथल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी, राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

परभणी इथं जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचं औचित्य साधून महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जनजागृती करण्यासाठी 'वोट फॉर परभणी' ही पदयात्रा काढण्यात आली.

स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त यवतमाळ इथे स्वामीजींच्या अठरा फूट उंचीच्या पुतळ्याचं अनावरण झालं. सामका आयुर्वेद केंद्राच्या आवारात उभारलेल्या या पुतळ्याचं अनावरण रामकृष्ण मठाचे अध्यक्ष स्वामी राघवेन्द्रानंद महाराज यांच्या हस्ते करण्यात आलं.

****

केंद्र सरकारने नुकतंच विकसित भारत जी राम जी विधेयक संमत केलं आहे. यामुळे शेतकरी आणि कष्टकऱ्यांचं शाश्वत उत्पन्न अधिक बळकट होण्यास मदत मिळेल अशी अपेक्षा अहिल्यानगर जिल्ह्यातले लाभार्थी दादासाहेब म्हस्के यांनी व्यक्त केली. ते म्हणाले–

**बाईट – दादासाहेब म्हस्के**

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात पहिल्या लोककला महोत्सवाचा काल समारोप झाला. या महोत्सवात सर्वसाधारण विजेतेपद यजमान मराठवाडा विद्यापीठाच्या संघाने पटकावलं. आठ कला प्रकारात विद्यापीठाच्या संघाने पारितोषिक जिंकून डॉ. संजय नवले स्मृती लोककला करंडकावरही आपलं नाव कोरलं. कुलगुरु डॉ. विजय फुलारी आणि रंगकर्मी डॉ. गणेश चंदनशिव यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आलं. या लोककला महोत्सवासाठी विविध विद्यापीठांच्या ६३ संघानी सहभाग घेतला होता.

****

दिल्लीच्या तापमानात लक्षणीय घट झाली असून, तिथे काल दोन पूर्णांक नऊ दशांश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. सर्वांत कमी एक पूर्णांक एक दशांश सेल्सिअस तापमान अमृतसर इथं, तर राजस्थानात चुरूमध्ये एक पूर्णांक तीन दशांश सेल्सिअस तापमान नोंदवलं गेलं. महाराष्ट्रातही विदर्भात किमान तापमानात लक्षणीय, तर मराठवाड्यात किंचित घट झाली आहे.

दरम्यान, या शीतलहरीच्या पार्श्वभूमीवर नवी दिल्लीच्या अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था-एम्सच्यावतीनं नागरिकांना विशेष सल्ला दिला आहे. मधुमेहाच्या रुग्णांनी पहाटे थंड वातावरणाऐवजी ऊन पडल्यावर चालण्याचा व्यायाम करावा, मूत्रपिंडाचा विकार असलेल्या रुग्णांनी नियमित रक्तदाब तपासावा तसंच उच्च रक्तदाब असलेल्या रुग्णांनी वैद्यकीय सल्ल्याने नियमित व्यायाम करण्याचा सल्ला दिला आहे.

****